**ठळक बातम्या**

- ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर शानदार संचलनसोहळा /ऑपरेशन सिंदूरच्या प्रारूपासह देशाच्या सामरिक सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक वारशाचं समृद्ध दर्शन

- आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोक चक्र प्रदान

- महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली इंजिन असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन

- पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, या आणि इतर मागण्यांसाठी उद्या देशव्यापी संप करायचा राष्ट्रीयीकृत बँकांच्या कर्मचारी संघटनांचा निर्णय

**आणि**

- महिला प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत आजच्या सामन्यात नाणेफेक जिंकून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचं मुंबई इंडियन्सला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रण

**<><><><><>**

देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र साजरा होत आहे. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत सेनादलं, निमलष्करी दलं  तसंच सांस्कृतिक पथकांच्या शानदार संचलनाने मानवंदना दिली. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून ....

**व्हॉइस कास्ट (१.१२ सेकंद)**

*(स्वातंत्र्याचा मंत्र वंदे मातरम आणि समृद्धीचा मंत्र आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेवर आधारित शानदार संचलन सोहळा आज नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर संपन्न झाला. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला फॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, इतर केंद्रीय मंत्री, संरक्षण दल प्रमुख, तिन्ही सेनादलांचे प्रमुख आणि इतर वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, या सोहळ्यासाठी देशभरातून आमंत्रित केलेले विशेष पाहुणे आणि हजारोंच्या संख्येने जनसमुदाय हा सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते.*

*भारताच्या सामरिक सामर्थ्याचं दर्शन घडवणारी शस्त्रास्त्रं हे संचलनाचं प्रमुख आकर्षण होतं. 'बॅटल ॲरे' पद्धतीने म्हणजे प्रत्यक्ष युद्धभूमीवरची व्यूहरचना दाखवणारं संचलन प्रथमच प्रजासत्ताकदिनी पहायला मिळालं.*

*विविध राज्य आणि केंद्रसरकारी विभागांचे मिळून ३० चित्ररथ आपापल्या कामगिरीचं दर्शन घडवणारी दृष्यं धारण करुन मानवंदना देत होते. ऑपरेशन सिंदूरचं प्रारूप दाखवणारा लष्कराचा चित्ररथ, आणि गणेशोत्सव या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ लक्षवेधी ठरला.*

*माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने सादर केलेल्या चित्ररथावर 'भारत गाथा - श्रुती, कृती, दृष्टी' या शीर्षकाखाली देशाची कथाकथन परंपरा तसंच वेव्हज् मंचाचं दर्शन घडवण्यात आलं. )*

मुख्य सोहळ्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वीर जवान स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन देशासाठी प्राणांचं बलिदान देणाऱ्या शहीदांना आदरांजली वाहिली.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अशोक चक्र हा शांततेच्या काळातला देशाचा सर्वोच्च शौर्य पुरस्कार प्रदान केला. ७७व्या प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर झालेल्या भव्य सोहळ्यात हा कार्यक्रम झाला. गेल्या वर्षीच्या जून महिन्यात ॲक्झिओम-४ या मोहिमेअंतर्गत शुभांशू शुक्ला हे अंतराळात जाणारे दुसरे, तर अंतराळ स्थानकावर राहणारे पहिलेच भारतीय ठरले.

**<><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राज्यातल्या नागरिकांना संबोधित केलं. महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत देशात आघाडीवर असून जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक विश्वसनीय केंद्र म्हणून पुढे आला आहे, असं त्यांनी नमूद केलं. राज्यानं एक हजार अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचं महत्त्वाकांक्षी ध्येय निश्चित केलं असून पायाभूत सुविधा आणि डिजिटल क्षेत्रात महाराष्ट्र देशाला दिशा देत असल्याचं राज्यपाल म्हणाले. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक वाढीचं शक्तिशाली इंजिन असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यभरात शासकीय निमशासकीय कार्यालयं, शाळा महाविद्यालयं तसंच गृहनिर्माण संस्थांच्या आवारात ध्वजवंदनासह अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

प्रजासत्ताक दिनाचा राज्याचा मुख्य सोहळा मुंबईत दादर इथल्या शिवाजी पार्क मैदानात पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मुंबईचे पालक मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह पोलीस अधिकारी, मान्यवर आणि नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते.
यावेळी मुख्यमत्र्यांनी राज्यातल्या जनतेला संबोधित केलं. राज्यघटनेतल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या मूल्यांमुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**होल्ड बाईट**

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीच्या आकाशवाणी भवनात झालेल्या कार्यक्रमाला माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आकाशवाणीवरचा मन की बात कार्यक्रम जनसामान्यांची सकारात्मक कामगिरी प्रकाशात आणण्याचा सशक्त मंच बनला असल्याचं ते म्हणाले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन, सचिव संजय जाजू, प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, आकाशवाणीचे महासंचालक राजीवकुमार जैन इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

७७ वा प्रजासत्ताक दिवस आज विविध राज्यांमधे तसंच विदेशातही मोठ्या उत्साहात साजरा झाला.

**<><><><><>**

राष्ट्रीयीकृत बँकांच्या कामकाजासाठी ५ दिवसांचा आठवडा तातडीनं लागू करावा, या आणि इतर मागण्यांसाठी उद्या देशव्यापी संप करायचा निर्णय बँक कर्मचारी संघटनांनी घेतला आहे. या संदर्भात मुख्य कामगार आयुक्तांबरोबरच्या वाटाघाटी फसल्यानंतर बँक कर्मचाऱ्यांच्या ९ संघटनांनी हा निर्णय घेतला. मात्र खासगी क्षेत्रातल्या बँकांचे कर्मचारी संपात सहभागी नाहीत.

**<><><><><>**

महिला प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत आज वडोदरा इथं मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात सामना सुरु आहे.

रॉयल चॅलेंजर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबईच्या ९ षटकांत १ बाद ६८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी  पद्म सन्मान जाहीर झालेल्या मान्यवरांमधे यंदा महाराष्ट्रातल्या ११ जणांचा समावेश आहे. त्यात कृषी क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामासाठी पद्मश्री पुरस्काराचे मानकरी ठरलेले परभणीचे श्रीरंगदादा लाड यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितलं…

**होल्ड- बाईट- श्रीरंगदादा लाड (२० सेकंद)**

**पालघर** जिल्ह्यातले ज्येष्ठ आदिवासी तारपावादक भिकल्या धिंडा यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला….

**होल्ड- बाईट- भिकल्या धिंडा (१६ सेकंद)**

**<><><><><>**

तूर, मसूर आणि उडीद दाळीची १०० टक्के खरेदी किमान आधारभूत किंमतीवर व्हावी, यासाठी सरकार प्रयत्न करत आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळेल, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज दिली. ७७व्या प्रजासत्ताक दिनी नवी दिल्ली इथं सरकारनं विशेष निमंत्रण दिलेल्या शेतकऱ्यांशी चौहान यांनी संवाद साधला. चीनला मागे टाकून भारत जगातला सर्वात मोठा भात उत्पादक झाला आहे. भाताच्या निर्यातीवरचे निर्बंध काढून टाकल्यामुळे शेतकऱ्यांना विशेषतः बासमती तांदळासाठी चांगला मोबदला मिळत असल्याचंही ते म्हणाले. डाळीचं पीक घेणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना फायदा व्हावा म्हणून सरकारनं डाळीवर ३० टक्के आयात शुल्क लादल्याचंही ते म्हणाले.

//<><><><>//